# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. ३०८/२०२५

**विषय : विद्यापीठ हिस्सा (University Share) पीएच्.डी. विद्यार्थ्यांच्या लॉगीनमधून भरणेबाबत.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या संशोधन केंद्रातील विद्यार्थ्यांना मा. कुलगुरू यांचे आदेश क्र. पीजीएस/६७६ दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० मधील ८ (४) अन्वये रु. ६५००/- प्रतिवर्ष इतका विद्यापीठ हिस्सा (University Share) भरणे अनिवार्य आहे.

सदरील विद्यापीठ हिस्सा भरण्याची कार्यवाही पीएच्.डी. विद्यार्थी संबंधित संशोधन केंद्रात त्यांचे वार्षिक शुल्क भरण्यासोबत करत होते. त्यानंतर संबंधित संशोधन केंद्र त्यांचेकडील प्राप्त पीएच्.डी. विद्यार्थ्यांचा विद्यापीठ हिस्सा पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर चलन तयार करून ते अदा करण्याची कार्यवाही होत होती.

तथापि, पीएच्.डी. नियमावली, पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणाली, पीएच्.डी. प्रवेशाबाबतची विकसित करण्यात आलेली नवीन प्रणाली, प्रबंध मूल्यमापनासाठी बहि:स्थ परीक्षक नेमणूक प्रक्रिया, इ. बाबतीत प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्रातील संशोधन मार्गदर्शक, समन्वयक, संशोधन केंद्रप्रमुख व पीएच्.डी. संबंधित काम पाहणारे कर्मचारी यांच्यासाठी माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०२४ मध्ये आयोजित कार्यशाळेत विद्यापीठ हिस्सा संबंधित संशोधन केंद्राच्या परवानगीने परस्पर विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाने त्यांचेकडे जमा करावा, अशा सूचना प्राप्त झाल्या होत्या.

त्याअनुषंगाने प्राप्त सूचनांचा विचार करून पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीमध्ये संशोधन केंद्राच्या परवानगीने विद्यार्थ्यांच्या लॉगीनमधून त्यांचा विद्यापीठ हिस्सा विद्यापीठाकडे अदा करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. त्याबाबतची कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात यावी.

१. पीएच्.डी. प्रवेशित विद्यार्थ्यांनी त्याच्या पीएच्.डी. ट्रॅकींग लॉगीनमधून विद्यापीठ हिस्सा (University Share) चलन जनरेटची विनंती (Request) करणे.

२. सदरील चलनाची विनंती (Request) त्याच्या संबंधित संशोधन केंद्राच्या लॉगीनमध्ये प्राप्त होईल.

३.संशोधन केंद्रानी संबंधित विद्यार्थ्याचा विद्यापीठ हिस्सा (University Share) भरण्यास मान्यता द्यावी.

४.पीएच्.डी. प्रवेशित विद्यार्थ्यास त्याच्या लॉगीनमधून विद्यापीठ हिस्सा (University Share) चलन अदा करण्यासाठी पर्याय उपलब्ध होईल व तेथून विद्यार्थी थेट चलन अदा करू शकतील.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क:
ईमेल : phdtracking_support@pun.unipune.ac.in
फोन : 020-71533633

गणेशखिंड, पुणे )
संदर्भ : शै. प्रवेश/ 3219 )
दिनांक : 02/12/2025 )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

प्रत:

| | |
|---|---|
| १. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित संशोधन केंद्रे, प्रस्तुत विद्यापीठ. | आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकानुसार कार्यवाही करावी तसेच आपल्या संशोधन केंद्रातील पीएच्.डी. प्रवेशित विद्यार्थ्यांना याबाबत अवगत करावे. |

२. मा. वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.